## संपादकीय.........

'नवज्योत' या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेचा पंधराव्या वर्षातील हा दुसरा अंक आपल्याकडे सुपूर्त करताना अतिशय आनंद होत आहे 'नवज्योत' या संशोधन पत्रिकेच्या संपादक मंडळाने सातत्याने नवनवीन प्रयोग करून ही संशोधन पत्रिका दर्जेदार समाजमान्य बनवण्याचा प्रयत्न केला आहे रिव्ह्यू कमिटीच्या सदस्यांनी सर्व संशोधन  पेपरचे छाननी करून सर्व संशोधन पेपर शास्त्रीय संशोधन पद्धतीच्या रीती आणि पद्धतीद्वारे बनवून अंतिम करण्याचा प्रयत्न केला आहे या संशोधन पत्रिकेद्वारे नवसंशोधकांना आपल्या संशोधन पेपर व लेख प्रसिद्धीचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सादर केलेल्या संशोधन पेपरना अंकामध्ये संधी देऊन महाविद्यालयातील प्राध्यापक संशोधक व विद्यार्थ्यांना एक दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे या अंकामध्ये शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेच्या 31 व्या अधिवेशनानिमित्ताने शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेची कार्यकारिणी राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यशास्त्रातील नवप्रवाहांची चर्चाविश्व या मुख्य विषयाच्या अनुषंगाने सादर केलेले काही संशोधन पेपर व लेख या अंकामध्ये प्रसिद्ध केले असून ओंकार शिक्षण संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सादर केलेल्या संशोधन पेपर प्रसिद्धीला वाव संधी दिलेली आहे राज्यशास्त्राबरोबरच मानव विज्ञान विद्या शाखेतील विविध विषयांना व कला शाखेतील पेपरना या अंकामध्ये सन्मानाचे स्थान देण्याचा प्रयत्न संपादक व रिव्ह्यू कमिटीच्या सदस्यांनी केलेला आहे सातत्याने सकस व दर्जेदार लिखाण व संशोधन यासाठी नवज्योत या संशोधन पत्रिकेने सातत्याने प्रयत्न केलेला आहे या प्रयत्नांना संशोधक लेखकांनी सातत्याने पाठिंबा दिलेला आहे आणि गेली पंधरा वर्षे सुरू असलेला नवज्योतचा यज्ञ आपल्या सहकार्याच्या जोरावर अखंड तेवत राहील अशी आशा आहे या अंकाचे निमित्याने सर्व वाचक लेखक संशोधक यांचे मी मनापासून आभार मानतो आणि असे सहकार्य पुढील काळामध्ये नवज्योत संशोधन पत्रिकेस लाभावे अशी आशा व्यक्त करतो .

धन्यवाद....

**संपादक.**
**प्राचार्य डॉ. रवींद्र भणगे,**
राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागाव,
तालुका- गडहिंग्लज, जिल्हा- कोल्हापूर.